# आकाशवाणी पुणे
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.10.2023** **वार – सोमवार**

---

**<u>आरोग्यवर्धिनी</u>**

पुण्यात 29 ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्यासाठी केंद्र सरकारकडून 6 कोटी 64 लाख रुपयांचा निधी महापालिकेला मिळाला आहे. येत्या महिन्याभरात या केंद्रांची उभारणी करण्याचं नियोजन महापालिकेच्या आरोग्य विभागाने केलं आहे. शहरातील आरोग्य सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी आणि आरोग्य यंत्रणा बळकट करण्यासाठी शहराच्या विविध भागांबरोबरच समाविष्ट गावातही आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्यात येणार आहेत. एकंदर 130 आरोग्य केंद्र उभारण्याचे प्रस्तावित आहे. या केंद्रात एक डॉक्टर, दोन परिचारिका, यांच्यासह चार आरोग्यकर्मीचं पथक कार्यरत असेल. पहिल्या टप्प्यात 29 केंद्र सुरू करण्याचं निश्चित करण्यात आलं असून हिंगणे, वारजे-कर्वेनगर, शिवणे, हडपसर-मुंढवा, वानवडी, कोथरूड, बावधन, कोंढवा, धावडे, धनकवडी या भागात त्यासाठी जागाही निश्चित करण्यात आली आहे.

**<u>डाऊन सिंड्रोम</u>**

ऑक्टोबर हा डाऊन सिंड्रोम जागरुकता महिना म्हणून पाळला जातो. त्या निमित्त रोटरी क्लब पुणे साऊथने, डाऊन सिंड्रोम विकलांगता असलेल्या मुलांचा एक सांस्कृतिक कार्यक्रम आज सेवासदन प्रशाला सभागृहात आयोजित केला होता. या मुलांनी, गाणी, नृत्य आणि वादन अतिशय सुंदर रीतीने सादर केलं. डाऊन सिंड्रोमग्रस्त मुलांनी बनवलेल्या कलात्मक वस्तूंचं प्रदर्शनही यावेळी भरवण्यात आलं होतं.

**<u>नियुक्ती</u>**

भारतीय लेखा सेवेतील 2008 च्या तुकडीतील प्रशासकीय अधिकारी संतोष डावरे यांची केंद्रीय दक्षता आयोगाच्या संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संतोष डावरे हे मुळचे पुण्यातील आहेत. अभियांत्रिकी शाखेतील पदवीधर असलेले डावरे यांनी याआधी अनेक महत्त्वाच्या पदांची जबाबदारी सांभाळली आहे.

**<u>पीएमपी</u>**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताफ्यात लवकरच सीएनजीवर धावणाऱ्या 300 बस दाखल होणार आहेत. यात 100 बस पीएमपीएमएलच्या असतील, तर 200 बस भाडेतत्वावावर घेतल्या जातील. या बस खरेदीसाठीच्या निविदा प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. येत्या 3 ते 4 महिन्यात या बस प्रवाशांच्या सेवेत धावतील. पीएमपीमध्ये बसची संख्या कमी असल्याने त्याचा परिणाम प्रवासी सुविधेवर होत आहे. त्यामुळे पीएमपीएमएल प्रशासन बसची संख्या वाढवण्यावर भर देत आहे.

**<u>बंधुता साहित्य संमेलन</u>**

राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी पाली भाषेच्या अभ्यासक, 'सत्यार्थी'च्या संपादक, ज्येष्ठ कवयित्री मधुश्री ओव्हाळ यांची निवड करण्यात आली आहे. राष्ट्रीय बंधुता साहित्य परिषदेच्या वतीने पुढच्या वर्षी 12 जानेवारीला

हे साहित्य संमेलना होणार आहे. याच्या स्वागताध्यक्षपदी प्रसिद्ध साहित्यिक आणि प्रकाशक चंद्रकांत वानखेडे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी दिली.

**<u>भाजपा</u>**

भारतीय जनता पक्षाने तेलंगणातील निझामाबाद जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रचाराची जबाबदारी शिवाजीनगरचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्याकडे सोपवली आहे. यापूर्वी पश्चिम बंगाल, गोवा, गुजरात, कर्नाटक आणि मध्यप्रदेश राज्यांमधील मतदारसंघांची जबाबदारी भाजपने आमदार शिरोळे यांच्यावर सोपविली होती.

**<u>डीजे</u>**

सार्वजनिक उत्सावांसह विवाहासारख्या काही समारंभात वापरल्या जाणाऱ्या डीजे आणि लेझरच्या वापरावर नियंत्रण आणण्याच्या मागणीसाठी पुण्यातील विविध राजकीय पक्षाचे नेते उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार आहेत. येत्या दोन-तीन दिवसांत याप्रकरणी याचिका दाखल केली जाणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>क्रीडा</u>**

पुणे जिल्हा क्रीडा परिषदेच्या वतीने शालेय स्तरावर मैदानी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत जिल्ह्यातील 227 शाळांनी भाग घेतला. तीन हजार मीटर धावणे प्रकारात 19 वर्षाखालील मुलींच्या गटात श्रावणी हिरे, तिहेरी उडी प्रकारात आरती सूर्वसे, 17 वर्षाखालील गटात 3 हजार मीटर धावणे प्रकारात सई धायगुडे, तिहेरी उडी प्रकारात अविशा गव्हाळे, 14 वर्षाखालील मुलींच्या गटात गोळा फेक प्रकारात ईश्वरी झेंडे यांनी सुवर्ण पदकांची कमाई केली.

**<u>क्रिकेट</u>**

पुणे जिल्हा क्रिकेट संघटनेच्या मान्यतेने 20 षटकांच्या फिनिक्स् करंडक अजिंक्यपद क्रिकेट स्पर्धा सुरू आहेत. यामध्ये लायन्स् क्रिकेट क्लबने जेडब्ल्युडी मॅजिशियनचा 24 धावांनी पराभव केला. अन्य एका सामन्यात युनिक स्पोर्ट्स क्लबने बीकेसी क्लबचा 4 गडी राखून पराभव करत विजयी सलामी दिली.

**<u>बुद्धिबळ</u>**

पुणे जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने रोटरी क्लब सिनर्जी रॅपिड बुद्धिबळ स्पर्धेत सम्मेद शेटे विजेता ठरला. स्विसलिंग पद्धतीने खेळवल्या गेलेल्या या स्पर्धेत 437 खेळाडूंनी सहभाग घेतला. वैभव राऊत यांनी दुसरं आणि विक्रमादित्य कुलकर्णी यांनी तिसरं स्थान पटकावलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश मुख्यतः निरभ्र होतं. आज कमाल तापमान 34 तर किमान तापमान 20 पूर्णांक 9 दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**